बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

क्र. एमएसए /785 दि. 25 /11/2026.

सूचनापत्र

बृहन्मुंबई महानगरपालिका फेलो - 2026 भरती अंतर्गत दि. 27.09.2026 रोजी सकाळी 11.30 ते 12.30 या वेळेत MKCL या संस्थने ई मेल द्वारे कळविलेल्या 11 परीक्षा केंद्रावर बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली. प्रति पद 3 उमेदवार याप्रमाणे पात्र झालेल्या पहिल्या 151 उमेदवारांची मुलाखत दि. 27.10.2026, 29.10.2026 आणि दि. 31.10.2026 रोजी MCMCR या केंद्रावर मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी / एफ / 2689 दि. 19.11.2026 अन्वये घेण्यात आली आहे.

बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परिक्षेसाठी उपस्थित उमेदवारांची गुणांसह यादी, मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण मिळून एकत्रित गुण नमुद असलेली यादी व त्याअनुषंगाने गुणवत्तेनुसार बृहन्मुंबई फेलोशिपसाठी निवड झालेल्या 50 उमेदवारांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका फेलो - 2026 भरतीप्रक्रियेअंतर्गत पात्र झालेल्या पहिल्या 50 उमेदवारांची कंत्राटतत्वावर नियुक्ती करण्यापूर्वी शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे तपासणी, वैद्यकीय तपासणी , चारित्र्य पडताळणी आवश्यक असून त्यासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी खालील तक्त्यात नमूद केलेल्या दिनांक व वेळेस उपस्थित रहावे.

कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहावयाचे ठिकाण	दिनांक	अनु.क्र वरील उमेदवार	उमेदवारांची संख्या	वेळ
Municipal Capacity building and research (MCMCR), Powai	01.12.2026	1 ते 12	12	10.30 ते 12.00
		13 ते 24	12	2.00 ते 3.30
	02.12.2026	25 ते 36	12	10.30 ते 12.00
		37 ते 50	14	2.00 ते 3.30

उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या दस्तऐवज तपासणी सूचीच्या अनुषंगाने सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तसेच स्वत: प्रमाणित केलेल्या छायांकित प्रतीचा संच सोबत आणावा.

अ.क्र.	मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती
1	उमेदवाराने स्वत/चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, Driving licence इ.
2	जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला / जन्मदाखला/एस.एस.सी प्रमाणपत्र इ.
3	माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र. (मूळ प्रती व मागील बाजूसह छायांकित प्रती)
4	पदवी परीक्षेची गुणपत्रिका, उत्तीर्ण प्रमाणपत्र.(मूळ प्रती व मागील बाजूसह छायांकित प्रती)
5	ज्या आस्थापनेत अनुभव घेतला आहे अशा आस्थापना प्रमुखांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र,तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पूर्णवेळ इंटर्नशिप / अप्रेंटीसशिप / आर्टीकलशिपसह एक वर्षाचा अनुभव असलेले प्रमाणपत्र, तसेच पूर्णवेळ स्वयंरोजगार, स्वयंउद्योजकतेचा अनुभव असल्यास अर्जदाराने त्याबाबतचे स्वयंघोषणापत्र.
6	नजीकच्या काळातील 04 पासपोर्ट साईज छायाचित्र
7	संबंधित अन्य कागदपत्रे

टिप -

1	आपल्या जन्मापासून ते आजमितीपर्यंत वास्तव्य केल्याचे सर्व पत्ते (कालावधीसह) तसेच, सदर कालावधीतील पोलीस स्थानक / पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती या कार्यालयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

सही/25.11.2026

प्रमुख कर्मचारी अधिकारी